# स्थायी समिती समोर ठेवावयाचा प्रस्ताव

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विविध विभागात संगणक ऑपरेटर आऊटसोर्स पध्दतीवर खाजगी एजन्सीकडून उपलबध्द करून घेण्यासाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आली होती.पाच निविदा प्राप्त झाल्या पैकी तीन निविदा उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर प्रति महा प्रति ऑपरेटर |
|---|---|---|
| १ | मे.सुंदर कन्सस्ट्रक्शन | १०५३०/- |
| २ | नेटकोर सोल्युशन | १०२००/- |
| ३ | गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस | १०१००/- |

उपरोक्त प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस यांची असून त्यांच्याशी वाटाघाटी नंतर रूपये १००००/- प्रति ऑपरेटर दर निश्चित करण्यांत आलेले आहे.

तरी विविध विभागांना आवश्यकतेनुसार संगणक ऑपरेटर उपलब्ध करून देण्यासाठी गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस यांचे दर मा. स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

कार्यकारी अभियंता (अ व ड)
महानगरपालिका औरंगाबाद

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 09.12.2013 (का.प.क्र. 13) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

केवळ कार्यालयीन कामकाजासाठी
कारणापुरता उतारा

**विषय क्र. 107 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विविध विभागात संगणक ऑपरेटर आऊटसोर्स पध्दतीवर खाजगी एजन्सीकडून उपलब्ध करून घेण्यासाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आली होती. पाच निविदा प्राप्त झाल्या पैकी तीन निविदा उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर प्रति महा प्रति ऑपरेटर |
|---|---|---|
| 01. | मे.सुंदर कन्स्ट्रक्शन | 10530/- |
| 02. | नेटकोर सोल्युशन | 10200/- |
| 03. | गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस | 10100/- |

उपरोक्त प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा गॅलक्सी मल्टी सर्व्हीसेस यांची असून त्यांच्याशी वाटाघाटी नंतर रूपये 10000/- प्रति ऑपरेटर दर निश्चित करण्यात आलेले आहे.

तरी विविध विभागांना आवश्यकतेनुसार संगणक ऑपरेटर उपलब्ध करून देण्यासाठी गॅलक्सी मल्टी सर्व्हीसेस यांचे दर मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभागात संगणक ऑपरेटर आऊटसोर्स पध्दतीवर खाजगी एजन्सीकडून उपलब्ध करून घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराच्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार गॅलक्सी मल्टी सर्व्हीसेस यांच्या रूपये 10000/- प्रति ऑपरेटर या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

10/12/13

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**सभापती-स्थायी समिती**
महानगरपालिका औरंगाबाद

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA HV 264204

10 DEC 2013

अ.क्र. 18960 कि. 100 दि. 11-12-13 कोणासाठी गॅलक्सी मल्टी सर्विस

हस्ते शेख इब्राहिम शे मुसा

मुद्रांक विक्रेता
मो. जियाउद्दीन शमशोद्दीन सिद्दीकी
म.न.पा. समोर, औरंगाबाद.

## करारनामा

**लिहून देणार :-** गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस, शेख इब्राहिम शेख मुसा
प्लॉट नं.६६, उस्मानिया मस्जीदसमोर, कटकट गेट, औरंगाबाद.

**लिहून घेणार :-** **कार्यकारी** अभियंता ( अ व ड ) महानगरपालिका, औरंगाबाद

महानगरपालिकेतील विविध वॉर्ड व विभागातील आवश्यक ती संगणकाची कामे करून घेण्यासाठी संगणक ऑपरेटर/प्रतिनिधी उपलब्ध करून देण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. प्राप्त निविदेपैकी गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस, शेख इब्राहिम शेख मुसा प्लॉट नं.६६, उस्मानिया मस्जीदसमोर, कटकट गेट, औरंगाबाद. यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे व त्यांच्याशी केलेल्या वाटाघाटी अंती ठरलेले दरास मा.स्थायी समितीच्या विषय क्र. १०७ दिनांक ९.१२.२०१३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यांत आली आहे. रू. १०,०००/- प्रति महा प्रति ऑपरेटर (सर्व करासहित) या दरात संगणक प्रतिनिधी उपलब्ध करून देण्यासाठी निविदेमधील व करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे संगणक प्रतिनिधी/ऑपरेटर उपलब्ध करून देण्यास लिहून देणाऱ्यांनी मान्य केले आहे. तसेच या प्रतिनिधींचे नांव, शैक्षणिक अर्हता, पत्ता, दुरध्वनी क्रमांक व इतर माहिती मनपाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सादर करण्यास आणि खालीलप्रमाणे एजन्सी कामे करील यास या करारनाम्याद्वारे लिहून देणार संमत्ती देत आहे.

१. वॉर्ड कार्यालय/विविध विभागातील सर्व संगणकीय कामे एजन्सीच्या प्रतिनिधीला करावी लागेल.

२. संगणकावर काम करणारे एजन्सीचे प्रतिनिधी / ऑपरेटर यांनी संगणकाची देखभाल, रक्षा करणे आवश्यक आहे. वेळोवेळी संगणकावर कार्यान्वित करण्यांत येणारे सॉफ्टवेअर मध्ये काम करणे आवश्यक आहे.

४. वॉर्ड अभियंता/वॉर्ड अधिकारी/शाखा प्रमुख यांनी संगणक प्रतिनिधी बाबत तक्रार दिल्यास त्वरीत पर्यायी व्यवस्था एजन्सी मार्फत करावी लागेल.

५. एजन्सीचे प्रतिनिधीने कार्यालयीन वेळेत तसेच एखाद्या वेळी वेळ पडल्यास कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त काम करावे लागेल. या करिता अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय असणार नाही. संबंधित प्रतिनिधी गैरहजर राहिल्यास त्याच्या ऐवजी इतर प्रतिनिधीची नियुक्ती एजन्सीला करावी लागेल.

६. वॉर्ड अधिकारी/वॉर्ड इंजिनियर/शाखा प्रमुख यांनी प्रतिनिधीचे काम समाधानकारक असल्याबद्दल चे प्रमाणपत्र दर महिन्यास संगणक कक्षास सादर केल्या नंतरच एजन्सीला देयक अदा केले जाईल.

७. संगणक प्रतिनिधी/ऑपरेटर, प्रतिनिधी यांना प्रचलित सॉफ्टवेअरचे ज्ञान असणे आवश्यक आहे. नसता सदर प्रतिनिधीस परत पाठविण्यात येईल व झालेल्या नुकसानाची भरपाई एजन्सीकडून करून घेण्याचे महानगरपालिका, औरंगाबाद यांना अधिकार राहतील.

८. संगणक प्रतिनिधी हा मनपाच्या अस्थापनेवर राहणार नाही. नियमित अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांस मिळणारे कोणतेही फायदे या कार्यालयामार्फत त्यास देय राहणार नाही. व त्यास भविष्यात महानगरपालिकेत नोकरीचा हक्क राहणार नाही.

९. महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार संगणक प्रतिनिधीच्या संख्येत वाढ किंवा घट होवू शकते त्याप्रमाणे प्रतिनिधी उपलब्ध करून द्यावे लागेल.

१०. संगणक प्रतिनिधी/ऑपरेटर यांनी औरंगाबाद महानगरपालिकेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई आपल्या एजन्सीकडून वसुल करण्यात येईल.

११. सदर आदेश फ़क्त १२ महिन्यासाठी लागू आहे. मनपा कार्यालयास आवश्यकता असल्यास मुदतवाढ देण्यात येईल.

१२. शासकीय/निमशासकीय कार्यालयास संगणक प्रतिनिधी /ऑपरेटर मार्फत त्यांच्या आवश्यकतेनुसार लागणारी कागदपत्रांची पुर्तता व आवश्यक ते कर / रिर्टन भरण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. मनपा औरंगाबाद यासाठी जबाबदार राहणार नाही.

१३. या प्रकरणामध्ये काही वाद निर्माण झाल्यास आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचा निर्णय अंतिम राहील.

१४ दर महिन्यास ऑपरेटरच्या हजेरी व निवेदेतील मान्य दराप्रमाणे एजन्सीला दर महिन्याला देयक अदा केले जाईल.

१५. वरील करारनामा उभय पक्षावर बंधनकार आहे व स्वखुशीने करण्यात येत आहे

**For GALAXY MULTI SERVICES**

Ibrahim

शेख इब्राहिम शेख मुसा
गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस, **Proprietor**
**9860460717**
प्लॉट नं.६६, उस्मानिया मस्जीदसमोर, कटकट गेट,
औरंगाबाद
लिहून घेणार

साक्षीदार
नांव :
सही :

**स्थायी समिती सदस्य**
**महानगरपालिका औरंगाबाद**

कार्यकारी अभियंता (अ व ड)
महानगरपालिका औरंगाबाद
लिहून देणार

साक्षीदार
नांव :
सही :

स्थळ :- औरंगाबाद.
दिनांक :-

**स्थायी समिती सदस्य**
**महानगरपालिका औरंगाबाद**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

फोन नं. (०२४०)-२३३३५३६-४०
फॅक्स नं. (०२४०) २३३१२१३


जा.क्र./मनपा/संगणक/337/२०१३ दिनांक :- ३१ /१२ /२०१३

**आदेश :**

प्रति,
गॅलक्सी मल्टी सर्व्हिसेस,
प्लॉट नं.६६, कटकट गेट,
औरंगाबाद

महानगरपालिकेतील विविध वॉर्ड व इतर विभागातील आवश्यक ती संगणकाची कामे करुन घेण्यासाठी संगणक ऑपरेटर/प्रतिनिधी उपलब्ध करुन देण्यासाठी निविदा मागविण्यांत आली होती. प्राप्त निविदेपैकी आपले दर सर्वात कमी असल्यामुळे व आपल्याशी झालेल्या वाटाघाटी अंती रू. १०,०००/- प्रति महा प्रति ऑपरेटर (सर्व करासहित) या ठरलेले दरास मा.स्थायी समितीच्या विषय क्र. १०७ दिनांक ९.१२.२०१३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यांत आली आहे.

करिता संगणक प्रतिनिधी उपलब्ध करून देण्यासाठी निविदेमधील व करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे प्रमाणे त्वरीत संगणक प्रतिनिधी/ऑपरेटर सोबत दिलेल्या यादीप्रमाणे पुरविण्यांत यावे.

सोबत : यादी

कार्यकारी अभियंता (अ व ड)
महानगरपालिका, औरंगाबाद.

| अ.क्र | विभाग | संख्या |
|---|---|---|
| १ | वार्ड अधिकारी अ | ३ |
| २ | वार्ड अभियंता अ | १ |
| ३ | वार्ड अधिकारी ब | ३ |
| ४ | वार्ड अभियंता ब | १ |
| ५ | वार्ड अधिकारी क | ३ |
| ६ | वार्ड अभियंता क | १ |
| ७ | वार्ड अधिकारी ड | ३ |
| ८ | वार्ड अभियंता ड | १ |
| ९ | वार्ड अधिकारी इ | ३ |
| १० | वार्ड अभियंता इ | १ |
| ११ | वार्ड अधिकारी फ | ३ |
| १२ | वार्ड अभियंता फ | १ |
| १३ | जन संपर्क विभाग | १ |
| १४ | आरोग्य विभाग | १ |
| १५ | सु ज श रो यो | १ |
| १६ | नगर सचिव | २ |
| १७ | सहाय्यक आ.-१ | १ |
| १८ | सहा. आयुक्त-२ | १ |
| १९ | विद्युत-१ | १ |
| २० | विधी विभाग | १ |
| २१ | मालत्ता विभाग | १ |
| २२ | संगणक कक्ष | १० |
| २३ | विशेष कक्ष | ३ |
| २४ | लेखा विभाग | ६ |
| २५ | गुंटेवारी | १ |
| २६ | प्रशास्कीय विभाग | १ |
| २७ | डॉ ब.अ.संशेधन केंद | १ |
| २८ | शिक्षण विभाग | १ |
| २९ | डेटा सेंटर | १ |
| ३० | महिला बाल कल्याण | १ |
| ३१ | उधान प्राणी संग्रहालय | १ |
| ३२ | कर निर्धारक व संचालक | १ |
| ३३ | संस्कृतीक विभाग | १ |
| | **एकूण** | ६२ |



कार्यकारी अभियंता
वॉर्ड अ,ड,ब मा.पु (शहर)
महानगर पालिका,औरंगाबाद,

सिस्टिम मॅनेजर (ई-गव्हर्नन्स)
महानगरपालिका, औरंगाबाद

# महानगरपालिका, औरंगाबाद

विषय : ______ पृष्ठ क्र. ____

(27) प्रती संगणक ऑपरेटर प्रती मास 10100/- ऐ
इतुन सर्व कमी रर इतुन प्रती वर्ष
रु. 40.0 लक्ष खर्च अपेक्षित इतुन प्र
स्तावत व येणाऱ्या वार्षिक खर्चास प्रथम
प्रशासकीय मान्यता होऊन मा.- स्थायी
समितीच्या मंजुरीस्तव सादर

मा. बो डी - ९
(28) (1) संबंधित

(29)

Discussed.

Approved as proposed

15/11/13
24/11/13